# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. १८ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ५९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## बँकिंग क्षेत्रातील गैरव्यवहारांना चाप

भारतीय वित्तीय व्यवस्थेमध्ये बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सर्वसामान्य नागरिक आपल्या कष्टाची कमाई अत्यंत विश्वासाने बँकांमध्ये जमा करत असतात. अशा परिस्थितीत या ठेवीदारांच्या पैशांचे रक्षण करणे आणि बँकिंग व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवणे हे देशाच्या केंद्रीय बँकेचे मुख्य कर्तव्य असते.

---> अग्रलेख - पान 2 वर

## उभ्या ट्रकला बसची धडक; 6 जणांचा जागीच मृत्यू, तर 26 जखमी

**वडोदरा :** गुजरात राज्याला हादरवून सोडणारी एक अत्यंत हृदयद्रावक आणि भीषण अपघाताची घटना बुधवारी पहाटे घडली आहे. वडोदरा-हालोल महामार्गावर भरधाव वेगात असलेल्या एका खाजगी लक्झरी बसने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला मागून जोरदार धडक दिल्याने हा अनर्थ ओढवला. या दुर्दैवी घटनेत ६ प्रवाशांचा जागीच करुण अंत झाला असून, २६ जण गंभीर जखमी झाले आहेत. कोतांबी गावाजवळ घडलेल्या या अपघाताने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## थोडक्यात वार्ता

### टीम इंडिया 'ए' ची फायनलमध्ये धडक; अफगाणिस्तानचा 101 धावांनी धुव्वा



**दांबुला :** प्रियांश आर्या, तिलक वर्मा आणि कुमार कुशाग्र यांच्या शानदार अर्धशतकांच्या जोरावर आणि निशांत सिंधूच्या अष्टपैलू कामगिरीच्या बळावर भारत 'अ' संघाने त्रिकोणी मालिकेत अफगाणिस्तान 'अ' संघाचा १०१ धावांनी मोठा पराभव केला आहे. या दणदणीत विजयासह भारताने थेट अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. या सामन्यापूर्वी दोन पराभवांमुळे दबावात असलेल्या भारतीय संघाने योग्य वेळी फॉर्ममध्ये येत दिमाखात फायनलचे तिकीट पक्के केले. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. सलामीवीर वैभव सूर्यवंशी (२८ चेंडूंत ३८ धावा) आणि प्रियांश आर्या यांनी ७५ धावांची धडाकेबाज भागीदारी करत भारताला चांगली सुरुवात करून दिली. प्रियांश आर्याने अवघ्या ३२ चेंडूंत ९ चौकार आणि १ षटकारासह ५८ धावांची खेळी केली. ऋतुराज गायकवाड (३० धावा) स्वस्तात बाद झाल्यानंतर, कर्णधार तिलक वर्मा (७५ चेंडूंत ५९ धावा) आणि विकेटकीपर कुमार कुशाग्र (६७ चेंडूंत ५८ धावा) यांनी चौथ्या गड्यासाठी १०४ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. शेवटच्या षटकांमध्ये निशांत सिंधू (२१*) आणि विप्रज निगम (२० चेंडूंत ३० धावा) यांनी केलेल्या फटकेबाजीमुळे भारताने निर्धारित ५० षटकांत ८ बाद ३१९ धावांचा डोंगर उभा केला. अफगाणिस्तानकडून फरीदुन दाऊदझाई, अब्दुल्ला अहमदझाई आणि फरमानुल्लाह सफी यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

### डॉ. अश्विनी जोशींच्या व प्राजक्ता लवंगारे वर्मा यांच्या बदलीला दिली स्थगिती

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांच्या बदलीच्या आदेशाला अवघ्या एका दिवसात स्थगिती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या जागी नियुक्त करण्यात आलेल्या प्राजक्ता लवंगारे वर्मा यांच्या नियुक्तीलाही शासनाने स्थगिती दिली असून दोन्ही आदेश पुढील आदेशापर्यंत थांबविण्यात आले आहेत. डॉ. अश्विनी जोशी यांची बदली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात (एमएमआरडीए) अतिरिक्त महानगर आयुक्तपदी करण्यात आली होती. त्यांच्या रिक्त पदावर प्राजक्ता लवंगारे वर्मा यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार वर्मा या गुरुवारी पदभार स्वीकारणार होत्या. मात्र, बुधवारी डॉ. जोशी यांनी महापालिकेच्या सभेसह नियमित कामकाजात सहभाग घेतला असतानाच दुपारी शासनाकडून दोन्ही अधिकाऱ्यांच्या बदली व नियुक्ती आदेशांना स्थगिती देण्यात आल्याचे आदेश जारी करण्यात आले.

### राज्याच्या विधानपरिषदेतील 11 जागांसाठी आज मतदान

**मुंबई :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील उर्वरित अकरा जागांसाठी गुरुवारी मतदान होणार आहे. या निवडणुकीत एकूण ३१ उमेदवार रिंगणात असून ७०४३ मतदार त्यांच्या राजकीय भविष्याचा निर्णय घेणार आहेत. मतदान प्रक्रिया सकाळी नऊ ते दुपारी चार या वेळेत पार पडणार आहे, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे. या निवडणुकीसाठी एकूण सतरा जागा जाहीर करण्यात आल्या होत्या. मात्र अहिल्यानगर, ठाणे, यवतमाळ, पुणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली या सहा मतदारसंघांमध्ये उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे आता सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी (मविआ) यांच्यात उर्वरित अकरा जागांवर थेट लढत रंगणार आहे. छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगाव, भंडारा-गोंदिया, धाराशिव-लातूर-बीड, सोलापूर, परभणी-हिंगोली, नांदेड, सांगली-सातारा, अमरावती आणि नागपूर या मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे.

### "खरं की काय"




# बातमीचा दणका : लाडसावंगी प्रकरणात अखेर परिचारिका साळवेस केले कार्यमुक्त

## प्रसूती कक्षातील वादाच्या प्रकरणाची गंभीर दखल; चौकशी अहवालानंतर निर्णय

**प्रकरणाचा घटनाक्रम**

- लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रसूती कक्षात वाद
- घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल
- नागरिकांकडून नाराजी आणि कारवाईची मागणी
- तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्राथमिक चौकशी
- चौकशी अहवाल वरिष्ठांकडे सादर
- मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार परिचारिका साळवे कार्यमुक्त
- संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना नोटीस

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रसूती कक्षात डॉक्टर आणि परिचारिकेमध्ये झालेल्या वादाचे प्रकरण अखेर कारवाईपर्यंत पोहोचले आहे. या प्रकरणात स्टाफ नर्स सुकेशनी साळवे यांना कार्यमुक्त करण्यात आले असून संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही नोटीस बजावण्यात आली आहे. चौकशी अहवालाच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही कारवाई केल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

काही दिवसांपूर्वी लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रसूती कक्षात डॉक्टर आणि परिचारिकेमध्ये वादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. प्रसूती कक्षासारख्या संवेदनशील ठिकाणी घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली होती. रुग्णसेवेच्या ठिकाणी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांमध्ये अशा प्रकारे वाद होणे योग्य नसल्याची भावना सर्वसामान्यांमधून व्यक्त होत होती.



सूचना, समज... तरीही प्रसूती कक्षात वाद; लाडसावंगी प्रकरणात आता कारवाई अटळ?

वारंवार तक्रारींकडे दुर्लक्ष की प्रशासनाची मूकसंमती? डीएचओंकडे अहवाल, सीईओंकडून कठोर निर्णयाची अपेक्षा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी सिद्धेश्वर थोर

छत्रपती संभाजीनगर : लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रसूती कक्षात डॉक्टर आणि परिचारिकेमधील वादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आरोग्य प्रशासनाची झोप उडाली आहे. रुग्णसेवेसारख्या अत्यंत संवेदनशील विभागात घडलेल्या या प्रकाराची गंभीर दखल घेत तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. नागेश सावरगावे यांनी प्राथमिक चौकशी अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) यांच्याकडे सादर केला आहे. अंतिम अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांच्याकडे पाठविण्यात येणार असून संबंधितांवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, या घटनेतील वैद्यकीय अधिकारी डॉ. पुनम मुंडे आणि परिचारिका सुकेशनी साळवे यांच्यातील वाद हा पहिलाच नसल्याचे चौकशीत समोर आले आहे. यापूर्वीही दोघांविरोधात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आरोग्य विभागाने समुपदेशन व बैठका घेऊन रुग्णसेवेला प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र त्या सूचनांचा कोणताही परिणाम दिसून न आल्याने अखेर प्रसूती कक्षातील वाद रस्त्यावर आला आणि त्याचा फटका थेट रुग्णसेवेला बसल्याचे चित्र निर्माण झाले.

या घटनेदरम्यान प्रसूतीसाठी दाखल असलेल्या महिलेला पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालय आणि नंतर घाटी रुग्णालयात हलवावे लागल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. सरकारी आरोग्य केंद्रात रुग्णांच्या जीवाशी संबंधित सेवा सुरू असताना कर्मचाऱ्यांमधील संघर्ष कितपत सहन केला जाऊ शकतो, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, दोन्ही कर्मचाऱ्यांची स्वतंत्र विधाने नोंदविण्यात आली असून व्हायरल व्हिडिओ, प्रसूतीदरम्यानची परिस्थिती, रुग्णसेवेवर झालेला परिणाम तसेच यापूर्वीच्या तक्रारींचा तपशील चौकशी अहवालात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे केवळ या एका घटनेपुरती नव्हे, तर संपूर्ण सेवाविषयक वर्तनाची पडताळणी प्रशासनाकडून केली जात आहे. आरोग्य विभाग आणि राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) च्या सेवा नियमांनुसार संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई, कारणे दाखवा नोटीस, बदली किंवा अन्य प्रशासकीय निर्णय घेतले जाऊ शकतात. मात्र या वेळी केवळ कागदी कारवाई नको, तर भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस संदेश देणारा निर्णय व्हावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

प्रश्न एका व्हिडिओचा नाही, रुग्णांच्या विश्वासाचा आहे!

सरकारी आरोग्य व्यवस्थेवर सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास टिकविण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. वारंवार तक्रारी, समुपदेशनानंतरही न सुधारणारे वर्तन आणि अखेर प्रसूती कक्षातील वादाचा व्हायरल व्हिडिओ हे केवळ शिस्तभंगाचे प्रकरण नसून रुग्णांच्या सुरक्षिततेशी संबंधित बाब मानली जात आहे. त्यामुळे या प्रकरणात केवळ चौकशी न करता जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई झाली, तरच आरोग्य यंत्रणेत शिस्त आणि नागरिकांचा विश्वास कायम राहील, अशी भावना परिसरातून व्यक्त होत आहे.

या घटनेनंतर हिंदू प्रकाश वार्ता दैनिकाने प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केला. घटनेचे गांभीर्य, रुग्णसेवेवर होणारा परिणाम आणि जबाबदारांवर कारवाईची आवश्यकता याबाबत वेळोवेळी बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यामुळे हे प्रकरण केवळ सोशल मीडियापुरते मर्यादित न राहता आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचले. नागरिकांकडूनही चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत होती.

प्रकरणाची दखल घेत तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. नागेश सावरगावे यांनी प्राथमिक चौकशी केली. संबंधित कर्मचारी, अधिकारी आणि उपलब्ध माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेला अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्यात आला. त्यानंतर जिल्हा आरोग्य प्रशासनाने अहवालाची तपासणी करून पुढील कार्यवाहीची प्रक्रिया सुरू केली.

प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे यांनी सांगितले की, स्टाफ नर्स सुकेशनी साळवे यांच्याबाबतचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार त्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. तसेच प्रकरणाची गंभीर दखल घेऊन आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे.

तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. नागेश सावरगावे यांनीही संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना नोटीस बजावण्यात आल्याचे स्पष्ट केले.

> "संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना नोटीस देण्यात आली आहे. रुग्णसेवेशी संबंधित ठिकाणी अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जाईल."
>
> \- डॉ. नागेश सावरगावे, तालुका वैद्यकीय अधिकारी

> "चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार स्टाफ नर्स साळवे यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. प्रकरणाची गंभीर दखल घेऊन ही कार्यवाही करण्यात आली आहे."
>
> \- डॉ. विशाल बेंद्रे, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी : छत्रपती संभाजी नगर

रुग्णसेवेशी संबंधित ठिकाणी शिस्त राखणे आवश्यक असून अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले.

लाडसावंगी येथील या घटनेमुळे सरकारी आरोग्य विभागामधील कामकाज, शिस्त आणि रुग्णसेवेबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. ग्रामीण भागातील नागरिक प्राथमिक आरोग्य केंद्रांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. अशा परिस्थितीत प्रसूती कक्षासारख्या महत्त्वाच्या विभागात वाद निर्माण होणे ही गंभीर बाब मानली जात आहे. त्यामुळे या प्रकरणात झालेली कारवाई ही केवळ एका कर्मचारी किंवा अधिकाऱ्यापुरती मर्यादित नसून सरकारी आरोग्य यंत्रणेत शिस्त आणि जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित करणारी असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, या प्रकरणात झालेल्या कारवाईनंतर आरोग्य केंद्रातील कामकाज अधिक जबाबदारीने आणि रुग्णहिताला प्राधान्य देत पार पडेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## बंद ट्रॅव्हल्स रस्त्यावरच उभी; सूचनाफलकाऐवजी झाडाची फांदी ठेवून जबाबदारी झटकली

### रामनगरात खाजगी ट्रॅव्हल्स कडून वर्दळीच्या मार्गावर निष्काळजीपणा

हिंदू प्रकाशवार्ता , गणेश पुजारी

**छत्रपती संभाजीनगर :** रामनगर परिसरात एक खासगी ट्रॅव्हल्स बस अचानक बंद पडल्याने ती रस्त्याच्या कडेला उभी करण्यात आली. मात्र वाहन बंद पडल्याची सूचना देण्यासाठी आवश्यक असलेले परावर्तित (रिफ्लेक्टर) सूचनाफलक, ट्रॅफिक कोन किंवा इशारा फलक न लावता बसच्या पाठीमागे केवळ झाडाची फांदी ठेवण्यात आल्याचे दिसून आले. त्यामुळे या ठिकाणी अपघाताचा धोका निर्माण झाला होता.




रामनगर परिसर हा नेहमीच वाहनांची व पादचाऱ्यांची मोठी वर्दळ असलेला मार्ग मानला जातो. याच ठिकाणी विविध ट्रॅव्हल्स कंपन्यांच्या बस नियमितपणे थांबत असल्याने वाहतूक सतत सुरू असते. अशा परिस्थितीत रस्त्यावर उभ्या असलेल्या मोठ्या बसमुळे मागून येणाऱ्या वाहनचालकांना अडथळ्याची स्पष्ट कल्पना येणे आवश्यक होते. मात्र संबंधित कर्मचाऱ्यांनी योग्य सुरक्षाव्यवस्था न करता केवळ झाडाची फांदी ठेवून औपचारिकता पूर्ण केल्याचे दिसून आले.

**मध्यरात्री अपघात होण्याची दाट शक्यता**

**सुदैवाने कोणतीही दुर्घटना घडली नाही. मात्र ट्रॅव्हल्स चालकाच्या निष्काळजीपणामुळे रात्री गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने संबंधित ट्रॅव्हल्स कंपनी व वाहतूक विभागाने अशा घटनांची दखल घेऊन सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करत गुन्हे दाखल करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.**

## दुचाकी चार चाकीची धडक दुचाकी स्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू

हिंदू प्रकाश वार्ता, प्रतिनिधी



**परभणी :** परभणी गंगाखेड महामार्गावरील डेट महाराणा प्रताप चौक कात मंगळवार दिनांक 16 जून रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास दुचाकी व चार चाकी वाहनाचे समोर समोर जोरदार धडकून भीषण अपघात झाला.

मिळालेले अधिक माहितीनुसार शेख अमित शेख गफार वय 40 वर्षे राहणार ताडकळस हे दुचाकी क्रमांक एम एच 22 बी डी 3864 या वाहनावरून गंगाखेड कडून परभणी कडे जात होते त्याचवेळी परभणीहुन गंगाखेडकडे जाणारी चार चाकी एम एस 57बी 4291 दैठना गावाजवळील महाराणा प्रताप चौकात आली असता दोन्ही वाहनाची समोरासमोर जोरदार धडक झाली शेख हमीद शेख गफार हा युवक गंभीर जखमी झाला. दैठना येथील दीपक कच्छवे, ज्ञानेश्वर कछवे , सोपान आगराळे, संदीप शिसोदे यांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली आणि जखमीला रुग्णवाहिकेद्वारे परभणी जिल्हा सामान्य रुग्णालय उपचारासाठी दाखल केले मात्र डॉक्टरकडून उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई-वडील पत्नी भाऊ एक आठ महिन्याची मुलगी आहे त्यांच्या मृत्यूमुळे ताडकळस परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे

## शासकीय वाहन दिसताच बाजारपेठा होतात पटापट बंद!

### तुकाराम मुंढे यांच्या कारवाईचा व्यापाऱ्यांनी घेतला धसका


**छत्रपती संभाजीनगर :** अन्न व औषध प्रशासनाचे नवनियुक्त आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कारवाईचा ग्रामीण भागाने इतका धसका घेतला आहे की, कोणतेही वाहन गावाकडे येताना दिसले की, सर्व दुकाने, पान टपऱ्या आणि दूध डेअरी पटापट बंद केल्या जात आहेत.

महसूल, वीज, आरोग्य, पशुसंवर्धन, शालेय शिक्षण, पोलिस इत्यादी विभागांची सरकारी वाहने विविध कारणांनी गावांना भेटी देतात. आपापल्या विभागांच्या कामांसाठी आलेली ही वाहने अन्न व औषध प्रशासनाचीच असून, ती धाडी टाकण्यासाठी आली असावीत, अशी धारणा झाल्यामुळे औषधींपासून किराणापर्यंतची दुकाने वाहन दिसाताच पटापट बंद केली जात असल्याचे चित्र आहे.

पैठण तालुक्यातील लोहगाव येथे मंगळवारी, आठवडी बाजारात नुकताच असा अनुभव आला. त्याची संपूर्ण तालुक्यात गरमागरम चर्चा सुरू झाली. विद्युत विभागाचे एक शासकीय वाहन गावात प्रवेश करताच दुकाने बंद करण्यात आली. यावरून अन्न व औषध विभागाच्या कारवाईचा कसा धसका ग्रामीण भागाने घेतला आहे, याची प्रचिती आली.

**खासगी वाहनांवरही 'महाराष्ट्र शासन':**

विविध शासकीय विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी गावांचे दौरे करताना आपल्या खासगी वाहनांवरही 'महाराष्ट्र शासन' किंवा 'भारत सरकार' अशा पाट्या बेकायदेशीरपणे लावून मिरवत आहेत. त्यामुळे ग्रामस्थ संभ्रमात पडत आहेत. अशी वाहने दिसली तरी धास्तावून दुकाने बंद केली जात आहेत. कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी आपल्या वाहनावर शासन किंवा त्याच्या विभागाची अशी पाटी लावू शकत नाही, असे कायदा सांगतो. परंतु , लोकांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी अशा पाट्या लावून फिरत आहेत. त्यांना पायबंद घालावा, अशी मागणी ग्रामीण भागातून केली जात आहे.



अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ यांच्या पालखी पादूकांचे आगमन झाल्यावर हजारो भाविकांनी दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला. गुरूवारी ही पालखी पुढील मार्गास सकाळी 10 वाजता प्रशस्त होणार आहे.अशी माहिती आयोजक महापौर समीर राजूरकर यांनी दिली.





# गिरीस्थान नगरपरिषद खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर

Email ID:-khultabadcomc@gmail.com — Telephone No: ०२४३७-२४१०७२

जा.क्र. 2026/नपखु/स्व.वि/995 — दि. 17/06/2026

## जाहीर सूचना

### (घनकचरा व्यवस्थापन नियम 2026 अंतर्गत)

खुलताबाद शहरातील सर्व नागरिक, व्यापारी आस्थापना, हॉटेल, रेस्टॉरंट, मार्केट, संस्था, शासकीय / निमशासकीय कार्यालये, हॉस्पिटल, मंगल कार्यालय, Bulk Waste Generator (BWG) तसेच शहरातील सर्व घटकांना याव्दारे सूचित करण्यात येते की, भारत सरकारच्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ (Solid Waste Management Rules २०२६) नुसार शहरातील घनकचऱ्याचे स्रोतस्थळी वर्गीकरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**त्याअनुषंगाने खालील सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील :**

१. ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी कचरा व घरगुती घातक कचरा आशा चार प्रकारात वेगवेगळा करूनच नगरपरिषदेकडे द्यावा.

२. प्लास्टिक, ई-वेस्ट, जैववैद्यकीय कचरा, बांधकाम व विध्वंस कचरा स्वतंत्रपणे वर्गीकृत करावा.

३. Bulk Waste Generator (BWG) यांनी स्वतःच्या स्तरावर कचरा प्रक्रिया व्यवस्था उभारणे /अधिकृत एजन्सीकडे वर्ग करणे आवश्यक राहील.

४. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, जाळणे किंवा नाल्यामध्ये टाकणे दंडनीय राहील.

५. नगरपरिषदेकडून नियुक्त घंटागाडी / कचरा संकलन वाहनासच कचरा द्यावा.

६. शहर स्वच्छता व पर्यावरण संरक्षणासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे.

वरील सूचनांचे पालन न करणाऱ्या व्यक्ती / संस्था / आस्थापनांवर घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ व संबंधित अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तरी सर्व नागरिकांनी स्वच्छ, सुंदर व प्रदूषणमुक्त शहर निर्मितीस सहकार्य करावे, ही विनंती.

(स्वाक्षरीत/-)
मुख्याधिकारी
गिरीस्थान नगरपरिषद खुलताबाद

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## सत्तेची हाव की दबावाचे राजकारण? जनतेच्या सहनशीलतेचा अंत

महाराष्ट्राच्या राजकारणाने गेल्या काही वर्षांत जे वळण घेतले आहे, त्याने लोकशाहीच्या सर्वच मर्यादा पार केल्याचे दिसून येत आहे. उबाठा गटाच्या खासदारांनी बंडाचे निशाण फडकावल्यानंतर आता आमदारांमध्येही मोठी चलबिचलता सुरू असल्याच्या चर्चांनी उधाण आले आहे. एका पक्षाला फोडून त्याचे खासदार आणि आमदार आपल्या बाजूला वळवण्याचा हा जो सलग प्रयत्न सुरू आहे, त्यामागे नेमकी काय कारणे आहेत, याचा विचार आता जनतेला करावाच लागणार आहे. ही केवळ सत्तेची आणि खुर्चीची हाव आहे, की पडद्यामागे लावलेले भीतीचे पिस्तूल आहे? केंद्रीय यंत्रणांचा आणि सत्तेचा धाक दाखवून लोकप्रतिनिधींना आपल्या बाजूला वळवण्याचे हे राजकारण महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला कलंकित करणारे ठरत आहे. या सर्व घडामोडींमागे सत्ताधाऱ्यांना जे साध्य करायचे आहे, ते खरोखरच साध्य होईल का, हा मोठा प्रश्न आहे. पक्षातील लोकप्रतिनिधी फोडून संख्याबळ वाढवता येईल, संसदेतील आणि विधानसभेतील ताकद संपवता येईल; परंतु जनतेच्या मनातील स्थान कसे मिळवणार? विरोधकांकडून असा दावा केला जात आहे की, एका लोकप्रतिनिधीला आपल्या बाजूला वळवण्यासाठी कोट्यवधी रुपयांची आमिषे दाखवली जात आहेत. जर या दाव्यांमध्ये तथ्य असेल, तर हा सर्वसामान्य जनतेच्या करातून जमा झालेल्या पैशांचा घोर अपमान आहे. केवळ स्वतःचे राजकीय भवितव्य सुरक्षित करण्यासाठी आणि मतदारसंघातील विकासकामांच्या निधीचे कारण पुढे करून निष्ठा बदलणाऱ्या लोकप्रतिनिधींना जनता कधीतरी माफ करेल का, याचा विचार या नेत्यांनी करायला हवा. दुसरीकडे, या राजकीय साठमारीत महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता मात्र पूर्णपणे होरपळून निघत आहे. सरकार चालवणाऱ्यांना केवळ खुर्ची टिकवण्याची काळजी आहे, तर विरोधकांना आपले अस्तित्व वाचवण्याची चिंता सतावत आहे. या सगळ्या गदारोळात जनतेचे मूळ प्रश्न बाजूला पडले आहेत. नको तिथे नियम लावून, सामान्य नागरिकांना नाहक त्रास देऊन विविध कामांसाठी रांगांमध्ये उभे करण्याची सवय या प्रशासनाला लागली आहे. जनतेला मूलभूत सुविधांसाठी वणवण करावी लागत आहे आणि लोकप्रतिनिधी मात्र सत्ता व पैशाच्या खेळात मग्न आहेत. महाराष्ट्राची जनता अजिबात दूधखुळी नाही. राजकारणात कोण काय चाल खेळत आहे, कोण कोणाच्या दबावाखाली वाकत आहे आणि कोणाला केवळ सत्तेचा मोह आहे, हे सर्वसामान्य नागरिक उघड्या डोळ्यांनी पाहत आहेत. लोकशाहीमध्ये जनताच सर्वोच्च असते. जेव्हा राजकीय नेते जनतेच्या मताचा आणि विश्वासाचा असा जाहीर लिलाव करतात, तेव्हा शेवटी जनतेलाच रस्त्यावर उतरून आपली ताकद दाखवावी लागते. सध्या सुरू असलेल्या या संभाव्य गळतीमुळे आणि फोडाफोडीच्या राजकारणामुळे तात्पुरते यश मिळत असल्याचे दिसत असले, तरी अंतिम निकाल जनतेच्या न्यायालयातच लागत असतो, हे विसरून चालणार नाही.

# ओम प्रकाश देवडा पीपल्स कॉ ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड हिंगोली याचा शासनाच्या जागेवर 12 वर्षांचा कथित अनधिकृत ताबा

## कठोर कारवाईची मागणी, जिल्हा प्रशासनासमोर मोठे आव्हान.!!!

हिंगोली शहरातील प्रमुख राज्य मार्गालगत असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जागेवरील कथित अनधिकृत ताब्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून या प्रकरणात कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. ॲड. प्रज्ञावंत मोरे, माजी महाराष्ट्र प्रदेश सचिव, बहुजन समाज पार्टी यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, हिंगोली यांच्याकडे सादर केलेल्या सविस्तर निवेदनामुळे शासनाच्या मालकीच्या जमिनींच्या संरक्षणाचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. निवेदनात ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडने भाडेपट्ट्याची मुदत संपल्यानंतरही शासनाच्या जागेवर ताबा कायम ठेवल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यामुळे शासन महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे.सादर करण्यात आलेल्या निवेदनानुसार महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयान्वये शासन मालकीची सुमारे 4000 चौरस फूट जागा संबंधित बँकेला 30 वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देण्यात आली होती. हा भाडेपट्टा 7 जुलै 2014 रोजी संपुष्टात आल्याचे नमूद करण्यात आले असून त्यानंतर भाडेपट्ट्याचे वैध नूतनीकरण झाल्याची कोणतीही अधिकृत नोंद उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे 8 जुलै 2014 पासून संबंधित जागेवरील ताबा हा कायदेशीरदृष्ट्या वैध नसून तो अनधिकृत भोगवट्याच्या स्वरूपाचा असल्याचे निवेदनात म्हटले आहे.




उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, हिंगोली यांनी दिनांक 19 ऑगस्ट 2025 आणि 5 जून 2026 रोजी सादर केलेल्या अहवालांचा उल्लेख करत ॲड. प्रज्ञावंत मोरे यांनी या प्रकरणात गंभीर निरीक्षणे नोंदविण्यात आल्याचे म्हटले आहे. अहवालांनुसार जमीन शासन मालकीची असल्याचे स्पष्ट करण्यात आले असून संबंधित बँकेला जागा मर्यादित कालावधीसाठी देण्यात आली होती. भाडेपट्ट्याची मुदत संपल्यानंतरही जागेचा वापर सुरू असल्याचे नमूद करण्यात आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालात सदर जागा प्रमुख राज्य मार्गालगत असून भविष्यातील रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हिंगोली शहराचा वेगाने वाढणारा विस्तार, वाढती वाहतूक, सार्वजनिक सुविधांची गरज आणि भविष्यातील विकास आराखडे लक्षात घेता संबंधित जागेचे महत्त्व अधिक वाढले असल्याचे ॲड.प्रज्ञावंत मोरे यांनी म्हटले आहे. शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे, रस्ता रुंदीकरण करणे, आपत्कालीन सेवांना अडथळामुक्त मार्ग उपलब्ध करून देणे आणि सार्वजनिक हिताच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणे यासाठी ही जागा शासनाच्या ताब्यात असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. सार्वजनिक मालमत्ता ही जनतेची संपत्ती असून तिचा वापर केवळ कायदेशीर अधिकाराच्या चौकटीतच होणे अपेक्षित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

निवेदनात शासन महसुलाच्या कथित नुकसानीचाही गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. भाडेपट्ट्याची मुदत संपल्यानंतरही जागेचा वापर सुरू राहिल्यामुळे शासनाला बाजारभावानुसार मिळणारे भाडे, वापर शुल्क, प्रीमियम किंवा इतर महसूल प्राप्त झाला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. सार्वजनिक संपत्तीचा विनामूल्य वापर झाल्यास त्याचा थेट परिणाम शासनाच्या आर्थिक हितावर होत असल्याचे नमूद करत या संपूर्ण कालावधीतील अनधिकृत भोगवटा शुल्क निश्चित करून त्याची वसुली करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच बाजारभावानुसार नुकसानभरपाई आणि दंडात्मक आकारणी करून शासनाला झालेल्या कथित नुकसानीची भरपाई करण्यात यावी, असेही निवेदनात म्हटले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 मधील विविध तरतुदींचा संदर्भ देत ॲड.प्रज्ञावंत मोरे यांनी शासनाच्या मालकीच्या जमिनींवरील अनधिकृत ताबा दूर करण्यासाठी महसूल प्रशासनाकडे व्यापक अधिकार असल्याचे नमूद केले आहे. शासनाच्या जमिनींचे संरक्षण करणे, त्यांच्यावरील अनधिकृत ताबे हटविणे आणि सार्वजनिक मालमत्तेचा कायदेशीर वापर सुनिश्चित करणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. संबंधित प्रकरणात उपलब्ध अभिलेख आणि अधिकृत अहवालांच्या आधारे आवश्यक ती कार्यवाही करण्याची वेळ आता आली असल्याचा दावा त्यांनी केला आहे. निवेदनात सर्वोच्च न्यायालय आणि विविध उच्च न्यायालयांनी वेळोवेळी सार्वजनिक जमिनींच्या संरक्षणाबाबत दिलेल्या निर्णयांचाही उल्लेख करण्यात आला आहे. सार्वजनिक मालमत्तेवर कोणाचाही कायमस्वरूपी हक्क निर्माण होऊ शकत नाही आणि सार्वजनिक हिताला बाधा पोहोचेल अशा कोणत्याही परिस्थितीत शासनाने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे, असे न्यायालयांनी अनेक निर्णयांत स्पष्ट केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. शासनाच्या मालकीच्या जमिनी या संपूर्ण समाजाच्या मालकीच्या असल्याने त्यांचे संरक्षण करणे हे प्रशासनाचे घटनात्मक कर्तव्य असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणात नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन झाल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित संस्थेला नोटीस देण्यात आली, त्यांचा खुलासा मागविण्यात आला आणि उपलब्ध अभिलेख, विभागीय अहवाल तसेच संबंधित पक्षाची भूमिका विचारात घेऊन निष्कर्ष नोंदविण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे कोणतीही पुढील कारवाई ही कायदेशीर प्रक्रिया आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारेच होणे अपेक्षित असल्याचे ॲड प्रज्ञावंत मोरे यांनी म्हटले आहे.या प्रकरणात कारवाई झाली नाही तर चुकीचा संदेश जाऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करत ॲड.प्रज्ञावंत मोरे यांनी शासनाच्या मालकीच्या जमिनींवर अनधिकृत ताबा ठेवण्यास प्रोत्साहन मिळण्याची भीती व्यक्त केली आहे. अशा प्रकरणांमध्ये दुर्लक्ष झाल्यास शासनाच्या मालमत्तेचे संरक्षण धोक्यात येईल आणि महसूल व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास कमी होईल, असे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे या प्रकरणाचा केवळ एका संस्थेपुरता विचार न करता सार्वजनिक मालमत्तेच्या संरक्षणाच्या व्यापक दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे संबंधित भाडेपट्टा नूतनीकरणाचा कोणताही प्रस्ताव फेटाळण्याची, 8 जुलै 2014 पासूनचा संपूर्ण अनधिकृत भोगवटा कालावधी निश्चित करून शुल्क आकारण्याची, बाजारभावानुसार नुकसानभरपाई व दंडात्मक रक्कम वसूल करण्याची, आवश्यक असल्यास बेदखलीची कार्यवाही करण्याची, जागा शासन ताब्यात घेण्याची आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला रस्ता रुंदीकरणासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच शासन महसुली नुकसानीची स्वतंत्र चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर आवश्यक ती कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.या निवेदनामुळे हिंगोली जिल्ह्यात शासनाच्या मालकीच्या जमिनींच्या वापराबाबतचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनला आहे. प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते, संबंधित विभागांचे अहवाल आणि अभिलेखांच्या आधारे कोणते निर्णय घेतले जातात आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली जाते, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, निवेदनातील आरोपांबाबत संबंधित बँकेची अधिकृत भूमिका समोर येणेही तितकेच महत्त्वाचे ठरणार असून त्यानंतरच या प्रकरणाचे संपूर्ण चित्र अधिक स्पष्ट होणार आहे.

**...ॲड. प्रज्ञावंत मोरे**
**माजी महाराष्ट्र प्रदेश सचिव,**
**बहुजन समाज पार्टी**

## रोजगार मेळाव्यातून तरुणांना मिळाला रोजगार;207 उमेदवारांची निवड

**छत्रपती संभाजीनगर, दि.१७ :** शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिकी एवं सुचना प्रौद्योगीकी संस्थान (NIELIT) यांच्या संयुक्त विद्यमाने १६ जून २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील पंडीत दीनदयाल उपाध्याय NIELIT केंद्र येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यातून २०७ उमेदवारांची विविध नामांकित कंपन्यांसाठी प्राथमिक निवड करण्यात आली.

मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा कार्यालयाचे सहायक आयुक्त श्री. राजू वाकुडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, बदलत्या रोजगार बाजारपेठेच्या गरजा ओळखून तरुणांनी नवनवीन कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज आहे. त्यांनी शासनाच्या विविध कौशल्य विकास व उद्योजकता योजनांची माहिती देऊन त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी श्री. भुजंग रिठे आणि श्री. सुरेश बहुरे यांनीही उमेदवारांना या सुवर्णसंधीचा उपयोग करून स्वतःची प्रगती साधण्याबाबत प्रोत्साहित केले.

मेळाव्यास ५४७ इच्छुक उमेदवारांनी उपस्थित राहून आपली नोंदणी केली होती. विविध आस्थापनांकडे एकूण ७६६ मुलाखती पार घेण्यात आल्या.मुलाखतीअंती २०७ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. या मेळाव्यात जिल्ह्यातील अनेक नामांकित नियोक्त्यांनी सहभाग घेत उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या आणि आपल्याकडील रिक्तपदांची माहिती दिली. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी NIELIT चे अधिष्ठाता अश्वनी कुमार टिक्कू, प्लेसमेंट अधिकारी सौरभ बनसोड, असिस्टंट प्रोफेसर योगेश शेजवळ तसेच कौशल्य विकास विभागाचे आदिंनी यांनी विशेष सहकार्य केले.

# युवा पिढीने अंमली पदार्थांपासून दूर राहावे : अविनाश गलांडे

## नशामुक्त भारत अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रम; अंमली पदार्थविरोधी शपथ व स्वाक्षरी मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** युवा पिढीने अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकण्याऐवजी समाज आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी केले. नशामुक्त भारत अभियानांतर्गत आयोजित जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते.

आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ गैरवापर व अवैध तस्करीविरोधी दिनानिमित्त वेरूळ सभागृह, जिल्हा परिषद येथे समाज कल्याण विभाग, नशामुक्त भारत अभियान जिल्हा समिती आणि जय विश्वकर्मा सर्वोदय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच अंमली पदार्थ प्रतिबंधक जनजागृती पोस्टरचे अनावरण अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. (भा.प्र.से.), अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के, महिला व बालकल्याण सभापती मिनाक्षी पवार, अर्थ व बांधकाम सभापती सचिन गरड तसेच शिक्षण व आरोग्य सभापती अनिता मोठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या भाषणात अविनाश गलांडे म्हणाले की, नशामुक्त भारत अभियानाचा विस्तार जिल्ह्यातील प्रत्येक स्तरापर्यंत करण्यात येणार आहे. अंमली पदार्थांचे वाढते दुष्परिणाम लक्षात घेता तरुणांनी व्यसनांपासून दूर राहण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीसाठी युवकांची भूमिका महत्त्वाची असून नशामुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा.

समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के यांनी अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. व्यसनमुक्तीची सुरुवात स्वतःपासून करावी आणि जिल्हा तसेच राज्य नशामुक्त करण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात उपस्थितांना अंमली पदार्थमुक्तीची शपथ देण्यात आली. तसेच जनजागृतीपर स्वाक्षरी मोहिमेद्वारे नागरिकांचा सहभाग नोंदविण्यात आला.

समाज कल्याण अधिकारी बाबासाहेब अरवत यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन नशामुक्त भारत अभियान समितीचे सदस्य विलास चंदणे यांनी केले.

कार्यक्रमास सहाय्यक लेखा अधिकारी व्ही. व्ही. मामीलवार, निरीक्षक करूणा सोनकांबळे, अतुल पिंपरकर, कल्पना ढाकणे, योगेश चौकडे, ज्ञानेश्वर कवडे आदींसह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

## महामार्ग पोलिसांच्या सतर्कतेने संशयास्पद वाहन अडवले; एक महिन्याच्या बाळासह महिला ताब्यात

**कन्नड :** दि.१७ जून - चाळीसगाव घाट परिसरात गस्तीदरम्यान संशयास्पदरीत्या फिरत असलेले विना क्रमांकाची चार चाकी वाहन महामार्ग पोलिसांनी अडवून तपासणी केली. या कारवाईत बीड शहरातून बेपत्ता झालेली महिला, तिच्यासोबत एक पुरुष आणि एक महिन्याचे बालक आढळून आले.



मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजेच्या सुमारास चाळीसगाव घाटात पोलीस हेडकॉन्स्टेबल सागर पाटील ड्युटीवर असताना विना क्रमांकाचे वाहन संशयास्पदरीत्या दिसून आले. वाहन थांबविल्यानंतर आत असलेल्या व्यक्तींनी काळ्या काचा खाली करण्यास टाळाटाळ केल्याने संशय अधिक बळावला. यानंतर त्यांनी तातडीने पोलीस यंत्रणेला माहिती दिली.

माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक नितेश इंद्रोले सह महामार्ग पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. चौकशीदरम्यान वाहनात अक्षय रेडे (वय ३१, रा. ठाकरे नगर, बीड) आणि कोमल मनोत (वय २९, रा. उत्तमनगर, बीड) हे एक महिन्याच्या बालकासह आढळून आले.सदर कारवाई महामार्ग पोलिस केंद्र आलापूर पोलिस उपनिरीक्षक नितेश इंद्रोले, पोलिस हेडकॉन्स्टेबल सागर पाटील,आर. भुसारे,झिरो पोलिस शांताराम सोनवणे, किसन राठोड यांनी केली

संशयास्पद हालचालींमुळे दोघांनाही पुढील चौकशीसाठी कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात आणण्यात आले. तपासादरम्यान संबंधित महिलेबाबत बीड शहर पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची नोंद असल्याचे समोर आले. पुढील आवश्यक कारवाईसाठी बीड पोलिसांचे पथक कन्नडकडे रवाना झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## राजवीर चव्हाणने जिंकले तीन सुवर्ण

**छत्रपती संभाजीनगर: बेंगलोरु येथे आयोजित २६ वी ज्युनिअर व सब ज्युनिअर नॅशनल पॅरा स्विमिंग चॅम्पियनशिप 2026 मध्ये छत्रपती संभाजीनगरच्या राजवीर चव्हाणने चमकदार कामगिरी करत तीन सुवर्णपदके जिंकले.**



## छत्रपती संभाजीनगरात २१ जून रोजी नीट परीक्षा; ५० केंद्रांवर १७,७३४ विद्यार्थी देणार परीक्षा

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET) २०२६ चे आयोजन २१ जून रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात करण्यात आले असून परीक्षा सुरळीत, पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात पार पडावी यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) यांनी व्यापक तयारी पूर्ण केली आहे. जिल्ह्यातील ५० परीक्षा केंद्रांवर एकूण १७ हजार ७३४ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.

नीट परीक्षेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी परीक्षा नियोजन, सुरक्षा व्यवस्था, वाहतूक सुविधा आणि केंद्रांवरील आवश्यक तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील ५० केंद्रांपैकी ४७ केंद्रे शहरात तर तीन केंद्रे ग्रामीण भागात आहेत. परीक्षा दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत होणार आहे. प्रत्येक केंद्रासाठी स्वतंत्र केंद्र निरीक्षक, कार्यकारी दंडाधिकारी आणि पोलीस बंदोबस्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परीक्षेच्या काळात केंद्र परिसरावर ड्रोनद्वारे नजर ठेवण्यात येणार असून सुरक्षेच्या दृष्टीने विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी रेल्वे स्थानक आणि बसस्थानकांवरून महानगरपालिकेच्या विशेष बससेवेची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक मदत आणि सुविधा केंद्रांवर उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

परीक्षा केंद्राबाहेर उमेदवारांची बायोमेट्रिक पडताळणी व उपस्थिती नोंदविण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी वेळेपूर्वी केंद्रावर पोहोचावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच प्रवेशपत्रावरील सर्व सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

बैठकीत जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सर्व अधिकारी व पोलीस यंत्रणेला परस्पर समन्वय राखून परीक्षा शांततेत आणि पारदर्शकपणे पार पाडण्याच्या सूचना दिल्या. बैठकीला पोलीस अधीक्षक (ग्रामीण) प्रकाश जाधव, पोलीस उपायुक्त रत्नाकर नवले, उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, नोडल अधिकारी नीलम बाफना, संतोष गोरड, विजय चव्हाण, प्रवीण फुलारी, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर तसेच महावितरण विभागाचे अधिकारी आणि परीक्षा समन्वयक उपस्थित होते.

## एमजीएम नॉन-गोल्फर्स वुमेन्स लीगची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद




**छत्रपती संभाजीनगर :** गोल्फ क्लबच्या अभिनव उपक्रमाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे. नॉन-गोल्फर्स वुमेन्स लीगची नोंद **वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स, लंडन**मध्ये करण्यात आली असून, याबद्दलचा प्रमाणपत्र वितरण समारंभ ॲम्बेसेडर कप २०२६च्या समारोप सोहळ्यात पार पडला. या लीगमध्ये ४५ महिलांनी सहभाग घेतला होता.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# बालकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी मनपाची विशेष अतिसार नियंत्रण मोहीम



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेचे मा. आयुक्त श्री. अमोल येडगे यांच्या निर्देशानुसार, मा. अतिरिक्त आयुक्त-२ श्रीमती कल्पिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. उज्वला भामरे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य विभागाचा वतीने दि. 16 जून 2026 ते 31 जुलै 2026 या कालावधीत मनपा शहर हद्दीत अतिसार नियंत्रण मोहीम राबविण्यात येत आहे. अतिसारामुळे होणारे बालमृत्यू रोखणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या मोहिमेचा शुभारंभ दि. 17 जून 2026 रोजी एन-8 रुग्णालय येथे माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. मेघा जोगदंड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. मनोज बजाज, डॉ. चंद्रकला गायकवाड, डॉ. वरद शिंदे, श्रीमती नंदा जाधव, श्रीमती सुनिता बुनगे, श्रीमती अनुसया सोनटक्के तसेच एन-8 रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

मोहिमेदरम्यान आशा सेविका त्यांच्या कार्यक्षेत्रातील घरोघरी भेटी देऊन नागरिकांना स्वच्छता, सुरक्षित पाणी व अतिसार प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन व समुपदेशन करणार आहेत. तसेच 0 ते 5 वर्षे वयोगटातील अतिसारग्रस्त बालक आढळल्यास त्यांना दोन ओआरएस (ORS) पाकिटे व झिंकच्या 14 गोळ्यांचे विनामूल्य वितरण करण्यात येणार आहे.

याशिवाय सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये ORT कॉर्नरची स्थापना करण्यात येणार असून, अतिसार प्रतिबंध, परिसर स्वच्छता, हात धुण्याची शास्त्रीय पद्धत, ओआरएसच्या वापराबाबत जनजागृती तसेच ओआरएस तयार करण्याचे प्रात्यक्षिक नागरिकांना दाखविण्यात येणार आहे.

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

# युवा शाहीर प्रा. प्रवीण जाधव यांना संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय संगीत नृत्य-नाट्य आणि लोककला क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या संगीत नाटक अकादमीच्या २०२४-२५ च्या उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारासाठी छत्रपती संभाजीनगरचे युवा शिवशाहीर प्रा. प्रवीण जाधव यांची निवड झाली आहे. महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील लोकसंगीतासाठी योगदान दिल्याबद्दल त्यांना हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. २५ हजार रुपये, ताम्रपट आणि मानाची शॉल असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

सध्या प्रवीण जाधव पंचवटी, नाशिक येथे नाट्यशास्त्र विभागात अधिव्याख्याता म्हणून कार्यरत असून, लोककला जतन आणि संवर्धनासाठी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. शिवशाहीर सुरेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शाहिरी व लोककलेचे धडे घेतले आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा गांधी मिशन येथे नाट्यशास्त्र विभागात पीसीसी इन डिप्लोमा सर्टिफिकेट कोर्स डॉ. राजू सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागातून डॉ. शशिकांत बऱ्हाणपूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली मास्टर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स एमपीएचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर मुंबई विद्यापीठात डॉ. प्रकाश खांडगे व डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली पीजी इन फोक आर्ट्स् हा अभ्यासक्रम पूर्ण केला. सध्या शाहिरी विषयातून डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच्डी सुरू आहे.

# सुरेश पाटील बनकर यांनी घेतली सावळदबारा सह परिसरातील बुथ प्रमुख बैठक



**सावळदबारा प्रतिनिधी. :** दि. १६ जून रोजी सावळदबारा येथे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव सुरेश पाटील बनकर आले होते. भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव सुरेश पाटील बनकर यांनी सावळदबारा सह परिसरातील बुथ प्रमुख बैठक घेतली.

भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालय मध्ये भाजपचे प्रदेश सचिव सुरेश पाटील बनकर आले त्यांचा सत्कार करताना भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी केला. भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव सुरेश पाटील बनकर यांनी सावळदबारा सह परिसरातील बुथ प्रमुख बैठक घेतली. या बैठकीस सावळदबारा, घाणेगाव, मोलखेडा, टिटवी, रवळा, जवळा, जामठी, पिपळवाडी, महालब्धा, नादाताडा, मूर्ती, हिवरी आदी गावांतील उपस्थित होते.

यावेळी भाजपचे व्हीजेएनटीचे प्रदेश उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, माजी जि. प. सदस्य शिवाजीराव बुढाळ, सभापती उत्तम चव्हाण, गणेशराव लोखंडे, प्रमोद पाटील, कैलास शेळके, शांताराम खराटे, मनोज बुढाळ, प्रभाकर बंडे, संजय चव्हाण, लवकेश जाधव, अनिल चव्हाण, संभाजी पवार, मुकुंद गायकवाड, लक्ष्मण पवार, आदी उपस्थित होते.

**CHANGE OF NAME** दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

**OLD NAME**
**SHAIKH SALIM SHAIKH NAWAB**
**residing SHAFEPUR PISHOR TQ**
**KANNAD Dist Chh.Sambhajinagar**
**[431104],**
**have changed my name to**
**New Name**
**SALIM NAWAB SHAIKH**
**and shall hereafter be known as**
**SALIM NAWAB SHAIKH**
**for all purposes.**

# जागतिक रक्तदान दिनानिमित्त पैठण येथे रक्तदान शिबिर; 20 रक्तदात्यांचा सहभाग

## घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते उद्घाटन; ग्रामीण भागात रक्तदान जनजागृतीचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता :प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक रक्तदान दिनानिमित्त ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथक, पैठण येथे आयोजित रक्तदान शिबिरात २० रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) चे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

घाटीच्या विकृतीशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विभागीय रक्त केंद्र आणि ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथक, पैठण यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक रक्तदाता दिन विविध जनजागृती उपक्रमांसह उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामीण भागात रक्तदानाबाबत जागरूकता वाढविणे आणि रक्तसंकलनाला चालना देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.




### ग्रामीण भागात रक्तदान जनजागृतीची गरज

**ग्रामीण भागात रक्ताची गरज मोठ्या प्रमाणावर असतानाही रक्तदान शिबिरांचे प्रमाण तुलनेने कमी असते. त्यामुळे अशा उपक्रमांमुळे रक्तदानाविषयी जनजागृती वाढण्यास मदत होत असून स्वेच्छा रक्तदात्यांची संख्या वाढविण्यास चालना मिळत आहे.**

यावेळी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून रक्तदानाचा सकारात्मक सामाजिक संदेश देण्यात आला. तसेच रक्तदानासंबंधी असलेले विविध गैरसमज दूर करून त्याचे सामाजिक व आरोग्यदृष्ट्या असलेले महत्त्व उपस्थितांना पटवून देण्यात आले. स्वेच्छेने रक्तदान करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमात उपअधिष्ठाता तथा विकृतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. भारत सोनवणे, कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड आणि रक्तपेढी प्रमुख डॉ. अंजली कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण पथक, पैठण येथील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंत्री विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

## भगूर येथील जिल्हा परिषद शाळेत वह्या, पेन्सिल व पेनचे वितरण; शिक्षणाचे महत्त्वही पटवून दिले

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वैजापूर तालुक्यातील भगूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल व पेन देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.

माजी सरपंच अमोल बुट्टे, माजी उपसरपंच प्रशांत चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य कुणाल चव्हाण व ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या पुढाकाराने तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळावी आणि शिक्षणाबाबत त्यांच्यात आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने साहित्याचे वितरण करण्यात आले.



### विद्यार्थ्यांना पटवून दिले शिक्षणाचे महत्त्व

**कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व विशद केले. नियमित अभ्यास, शिस्तबद्ध जीवनशैली आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संदेश देण्यात आला. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही सामाजिक जबाबदारी असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.**

यावेळी पंचायत समिती सदस्या शितल आल्हाट, राहुल आल्हाट, सरपंच जयश्री जनार्दन चव्हाण, जनार्दन चव्हाण, मच्छिंद्र चव्हाण, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रदीप जाधव, उपाध्यक्ष सुरेश बुट्टे, दादाभाऊ शेजवळ, पोपट बुट्टे, मुख्याध्यापक सोनवणे सर, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमास ग्रामस्थ व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनीही मिळालेल्या साहित्याबद्दल आनंद व्यक्त केला.

दरम्यान, मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# वृद्धांच्या सेवेत युवासेना; मातोश्री वृद्धाश्रमात अन्नदानाचा उपक्रम

## आदित्य जनसेवा सप्ताहानिमित्त ज्येष्ठ नागरिकांसोबत संवाद; सामाजिक बांधिलकीचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** समाजातील वंचित आणि गरजू घटकांप्रती संवेदनशीलता जपत युवासेना छत्रपती संभाजीनगरच्या वतीने आदित्य जनसेवा सप्ताहांतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिवसेना नेते तथा युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा आणि समाजकार्याचा संदेश देत पैठण रोडवरील मातोश्री वृद्धाश्रमात अन्नदानाचा उपक्रम आयोजित करण्यात आला.

या उपक्रमात वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना भोजन देण्यात आले तसेच त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या आरोग्याची व विचारपूस करण्यात आली. उपस्थित युवासैनिकांनी ज्येष्ठांचे आशीर्वाद घेत समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी अधोरेखित केली.



कार्यक्रमाचे आयोजन युवासेना पश्चिम शहर अधिकारी अजय चोपडे यांनी केले होते. यावेळी जिल्हा युवाधिकारी तथा नगरसेवक हनुमान शिंदे, कॉलेज कक्षप्रमुख अभिजीत थोरात, शहर अधिकारी रामेश्वर कोरडे, स्वप्निल दिंडोरे, शिवसेना उपशहरप्रमुख वसंतभाई शर्मा, सुरेश गायके, विक्रम खडके, बाळासाहेब मिसाळ, उपजिल्हा अधिकारी यश पागोरे, देविदास रत्नपारखे, मिथिल ढोकरट, किरण वडागळे, बाळासाहेब कांबळे, देवेंद्र गायकवाड, सोहम चोपडे, उदयराज चोपडे यांच्यासह मोठ्या संख्येने युवासैनिक उपस्थित होते.

युवासेनेच्या वतीने आदित्य जनसेवा सप्ताहादरम्यान विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, समाजसेवेच्या माध्यमातून वाढदिवस साजरा करण्याची परंपरा अधिक दृढ होत असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

# परभणी-हिंगोली स्थानिक निवडणुकीसाठी मतदान पथके रवाना



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** विधान परिषदेच्या परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होत असून, मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी मतदान साहित्य घेऊन आज संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना झाले.

यावेळी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी मतदान पथकांच्या वाहनांना हिरवी झेंडी दाखवून रवाना केले. निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक आणि सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

मतदान केंद्रांवर आवश्यक साहित्य, मनुष्यबळ व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# बँक अधिकाऱ्यांच्या सतर्कतेने सायबर फसवणुकीतील 37 हजार रुपये परत

**छत्रपती संभाजीनगर :** सायबर गुन्हेगारांनी ऑनलाइन फसवणुकीद्वारे खात्यातून लंपास केलेले ३७ हजार रुपये संबंधित खातेदाराला परत मिळवून देण्यात बँक अधिकाऱ्यांना यश आले. त्यांच्या तत्परतेमुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही रक्कम अवघ्या काही दिवसांत खात्यात जमा झाली.

माहितीनुसार, २४ मे रोजी गोलवाडी शाखेतील एका खातेदाराच्या खात्यातून सायबर गुन्हेगारांनी ऑनलाइन व्यवहाराद्वारे ३७ हजार रुपये परस्पर काढून घेतले. ही बाब लक्षात येताच खातेदाराने तातडीने बँकेशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.

त्यानंतर बँक प्रशासनाने त्वरित हालचाली करत संबंधित व्यवहारांची माहिती संकलित केली. तसेच खाते होल्ड करण्याची प्रक्रिया राबवून पुढील आर्थिक नुकसान टाळले. यानंतर संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत रक्कम परत मिळविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

अखेर ९ जून रोजी खातेदाराच्या खात्यात संपूर्ण ३७ हजार रुपयांची रक्कम परत जमा करण्यात आली. या प्रक्रियेत समर्थनगर शाखेच्या शाखाधिकारी स्वाती देशमुख, गोलवाडी शाखेचे शाखाधिकारी जितेंद्र केदार तसेच मुख्यालयातील मनीष माहुलकर यांनी विशेष प्रयत्न केले.

रक्कम परत मिळाल्यानंतर खातेदाराने बँक अधिकाऱ्यांच्या तत्परतेबद्दल आणि सहकार्याबद्दल समाधान व्यक्त करत त्यांचे कौतुक केले. या घटनेमुळे सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये तातडीने तक्रार नोंदविणे आणि बँकेचा सक्रिय पाठपुरावा किती महत्त्वाचा ठरतो, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# महाराणा प्रताप यांना अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर :** सिडको कॅनॉट येथील शूरवीर महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास मनपाचे स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी दि. 17 जून रोजी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महाराणा प्रताप यांच्या जयंतिनिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी यावेळी नगरसेवक शिवाजी दांडगे, गणेश नावंदर, नगरसेविका सुनीता सोळुंके, दया गायकवाड, मुख्य उद्यान अधिक्षक विजय पाटील, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, रविंद्र खरात, संतोष कोठाळे, करण साळवे, जयंती समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिक आदींची उपस्थिती होती. यावेळी अभिवादन करण्यात आल्यानंतर सभापती यांनी पुतळा परिसराची पाहणी केली. दरम्यान, अभिवादनासाठी उपस्थित असलेल्या महाराणा प्रताप जयंती समितीचे कार्यकर्त्यांनी येथे ध्वज स्तंभ व हाय मास्ट लावण्याची मागणी केली असता तातडीने सभापती यांनी याबाबत संबंधित अधिकारी यांना सुचना केल्या.

# देशात अव्वल ठरली घाटीची रक्तपेढी; राष्ट्रीय रक्तसंक्रमण परिषदेकडून मानाचा गौरव; 224 रक्तदान शिबिरांतून 15 हजार रक्तपिशव्यांचे संकलन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील प्रादेशिक रक्तपेढीने राष्ट्रीय स्तरावर अभिमानास्पद कामगिरी करत देशात प्रथम क्रमांकाचा मान पटकावला आहे. राष्ट्रीय रक्तसंक्रमण परिषद (एनबीटीसी) आयोजित राष्ट्रीय रक्तसंक्रमण सेवा स्वयंसेवी संस्था परिषदेत (एनएल-एनजीओ-सीओबीटीएस) शासकीय रक्तपेढी विभागात घाटीच्या रक्तपेढीची उत्कृष्ट कामगिरी नोंदविण्यात आली. अहमदाबाद येथे झालेल्या परिषदेत हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

रक्तदान चळवळीचा प्रसार, सुरक्षित रक्तपुरवठा, गुणवत्तापूर्ण रक्तसंक्रमण सेवा आणि गरजू रुग्णांना वेळेत रक्त व रक्तघटक उपलब्ध करून देण्याच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत हा सन्मान देण्यात आला. आपत्कालीन परिस्थिती, अपघात, मोठ्या शस्त्रक्रिया, कर्करोग उपचार, थॅलेसेमिया आणि विविध रक्तविकारग्रस्त रुग्णांसाठी घाटीची रक्तपेढी गेल्या अनेक वर्षांपासून जीवनदायी ठरत आहे.

मूल्यांकन कालावधीत रक्तपेढीने 224 स्वेच्छा रक्तदान शिबिरांचे आयोजन करून 15 हजार 32 रक्तपिशव्यांचे संकलन केले. याच कालावधीत 23 हजार 447 रक्त व रक्तघटकांचे वितरण करण्यात आले. विविध महाविद्यालये, उद्योग, सामाजिक संस्था, शासकीय यंत्रणा आणि स्वयंसेवी रक्तदाता संघटनांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या जनजागृती मोहिमांमुळे रक्तदान चळवळीला मोठी चालना मिळाली.




### राष्ट्रीय स्तरावर शासकीय रक्तपेढ्यांमध्ये प्रथम क्रमांक

**हा राष्ट्रीय सन्मान केवळ घाटीच्या प्रादेशिक रक्तपेढीचाच नव्हे, तर संपूर्ण मराठवाड्याच्या आरोग्य व्यवस्थेसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. रक्तदानाच्या माध्यमातून हजारो नागरिकांनी दिलेल्या योगदानाची ही राष्ट्रीय पातळीवर झालेली दखल असल्याची भावना वैद्यकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.**

रक्तदाता निवड, रक्तसंकलन, रक्तघटक निर्मिती, संसर्गजन्य रोग तपासणी, साठवणूक आणि वितरण या सर्व प्रक्रियांमध्ये राष्ट्रीय मानकांचे काटेकोर पालन करून रक्तपेढीने गुणवत्ता व्यवस्थापनाचा उच्च दर्जा कायम ठेवला आहे. अत्याधुनिक प्रयोगशाळा सुविधा आणि प्रगत तपासणी प्रणालीमुळे प्रत्येक रक्तपिशवीची सुरक्षितता सुनिश्चित केली जात आहे.

### देशाला जीवनदान देणाऱ्या रक्तपेढीची आकडेवारी

- 224 स्वेच्छा रक्तदान शिबिरे
- 15,032 रक्तपिशव्यांचे संकलन
- 23,447 रक्त व रक्तघटकांचे वितरण
- बॉम्बे रक्तगटाच्या 3 रुग्णांना रक्तपुरवठा
- आरएच निगेटिव्ह रक्तगटाच्या अनेक रुग्णांना मदत

विशेष म्हणजे, दुर्मिळ रक्तगटांच्या रुग्णांनाही रक्त उपलब्ध करून देण्यात रक्तपेढीने उल्लेखनीय यश मिळविले आहे. मागील वर्षभरात बॉम्बे रक्तगटाच्या तीन रुग्णांना तसेच आरएच निगेटिव्ह रक्तगटाच्या अनेक रुग्णांना आवश्यक रक्त पुरविण्यात आले. थॅलेसेमिया आणि इतर गंभीर रक्तविकारग्रस्त रुग्णांसाठी विशेष सुसंगत रक्तघटक उपलब्ध करून उपचार प्रक्रियेत मोलाची मदत करण्यात आली.

या यशामागे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचे मार्गदर्शन, उपअधिष्ठाता तथा विकृतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. भरत सोनवणे यांची दूरदृष्टी आणि रक्तपेढीतील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व हजारो स्वेच्छा रक्तदात्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. रक्त संक्रमण अधिकारी डॉ. आदित्य साळुंके यांनी हा राष्ट्रीय सन्मान स्वीकारला.

# पावसाळ्यापूर्वी नालेसफाईला वेग द्या; 20 जूनपर्यंत कामे पूर्ण करा : अनिल मकरिये



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील मोती कारंजा, गांधी नगर, औषधी भवन, दुल्हा-दुल्हन चौक, संभाजीपेठ, नाथ मार्केट आणि सेना भवन परिसरातील नालेसफाई कामांची स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. पाहणीदरम्यान नालेसफाईचे सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित ५० टक्के काम अद्याप बाकी असल्याचे निदर्शनास आले. पावसाळ्यापूर्वी सर्व नालेसफाईची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच नाल्यांमध्ये कचरा टाकणारे व सांडपाणी सोडणाऱ्या नागरिकांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले. मोती कारंजा, गांधी नगर, औषधी भवन आणि नाथ मार्केट परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचेही सांगण्यात आले असून, त्याद्वारे नाल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्यांवर लक्ष ठेवता येणार आहे.

पावसाळ्यात पाणी तुंबणे, नागरिकांना होणारा त्रास आणि संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी नालेसफाईची सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश यावेळी देण्यात आले. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक ठिकाणी नाल्यांवर जाळ्या बसविणे, नाल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करणे आणि पावसाळ्यात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी विशेष दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले.यावेळी उप आयुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख नंदकिशोर भोंबे,कार्यकारी अभियंता अनिल तनपुरे,उप अभियंता आरती नवगीरे,सहायक आयुक्त रमेश मोरे आदींची उपस्थिती होती.

# गैरव्यवहारांच्या आरोपांनी स्थायी समितीची बैठक निघाली ढवळून

## अंगणवाडी, आरोग्य, घरकुल आणि विकासकामांबाबत सदस्यांचा हल्लाबोल; अनेक प्रकरणांच्या चौकशीची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद स्थायी समितीच्या बुधवारी झालेल्या बैठकीत विविध विभागांतील कथित गैरव्यवहार, प्रशासनातील त्रुटी आणि विकासकामांच्या गुणवत्तेच्या मुद्द्यांवर जोरदार चर्चा रंगली. अंगणवाडी विभागातील धान्य वितरणापासून आरोग्य विभागातील कारभार, घरकुल योजनेची अंमलबजावणी तसेच निकृष्ट दर्जाच्या विकासकामांपर्यंत अनेक प्रश्न उपस्थित करत सदस्यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

सदस्य संजय निकम आणि डॉ. राधाकिसन पठाडे यांनी विविध विषय मांडत संबंधित विभागांकडून स्पष्टीकरणाची मागणी केली. संभाजीनगर तालुक्यातील एका अंगणवाडी पर्यवेक्षिकेकडून सेविकांकडील धान्य घेतले जात असल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी सदस्यांनी केली. महिला व बालविकास विभागाने याबाबत पडताळणी करून अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले.

बैठकीत घरकुल योजनेतील अडचणी, अभियंत्यांची रिक्त पदे, प्राथमिक आरोग्य केंद्रांतील डॉक्टर व कर्मचाऱ्यांची कमतरता, प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबतचे प्रश्न तसेच विकासकामांच्या गुणवत्तेचे मुद्देही गाजले. वैजापूर तालुक्यात गेल्या चार महिन्यांपासून अभियंता उपलब्ध नसल्याने अनेक लाभार्थ्यांची कामे रखडल्याचे सांगण्यात आले. काही अभियंत्यांकडे असमतोल प्रमाणात गावे सोपविल्याने कामकाजावर परिणाम होत असल्याची बाबही सदस्यांनी निदर्शनास आणून दिली.

आरोग्य विभागाच्या कामकाजावरही सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती आणि वेतनाबाबतचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला. संबंधित कर्मचारी प्रत्यक्ष कामावर हजर नसतानाही वेतन घेत असल्याचा आरोप करण्यात आला. याप्रकरणी सादर झालेल्या चौकशी अहवालाची प्रत मागविण्यात आली असून २४ जूनपर्यंत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

लाडसावंगी येथील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीबाबतही सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. रात्रीच्या वेळी रुग्णांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याच्या तक्रारींचा उल्लेख करत संबंधितांवर कारवाईची मागणी करण्यात आली. तसेच जिल्ह्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर व कर्मचाऱ्यांची टंचाई असल्याने आरोग्य सेवा विस्कळीत होत असल्याचा मुद्दाही बैठकीत ऐरणीवर आला.

दरम्यान, काही शाळांमध्ये लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या वर्गखोल्या अल्पावधीत गळतीला लागल्याचे प्रकरणही सदस्यांनी उपस्थित केले. निकृष्ट दर्जाच्या विकासकामांबाबत संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. विविध विभागांतील तक्रारींची चौकशी करून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाकडून बैठकीत देण्यात आले. त्यामुळे विविध गैरव्यवहारांच्या आरोपांमुळे आणि चौकशीच्या मागण्यांमुळे स्थायी समितीची ही बैठक विशेष गाजली.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेका दिनी सायकलवरुन प्लास्टिक निर्मूलन युवकांने पूर्ण केला अनोखा संकल्प

**छत्रपती संभाजीनगर :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्रीमंत छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या 352 व्या राज्याभिषेक दिनानिमित्त युवकांने आगळावेगळा संकल्प तडीस नेला.या तरूणाने सायकलवरून कोल्हापूर येथील पन्हाळ किल्ला परिसरातील प्लास्टिकचा कचरा उचलून आजूबाजूलाही स्वच्छता केली. हा एक सामाजिक उपक्रम करून पर्यावरण पूरक प्रदूषण मुक्त तसेच गड किल्ल्यांवर होणारे अतिक्रमण थांबावे गड -किल्ल्यांचे संवर्धन व्हावे असा संदेश देण्यात आला.या सामाजिक उपक्रमाने शिवराज्याभिषेनीमित्त "सायकल वेडे कोल्हापूर "तर्फे या संस्थेचे अध्यक्ष राम कारंडे यांनी असा उपक्रम केला. या उपक्रमाचे पन्हाळा ग्रामस्थांनी कौतुक करत त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. राम यांनी सायकलवर कापडी पिशव्या टांगत शेकडो रिकाम्या फेकून दिलेल्या मिनरल वॉटर बॉटल, बंदी असलेल्या कॅरीबॅगचे ढिग, अन्नपदार्थ रॅपर्स व पर्यावरणास हाणी करणारे घटक उचलून त्याची मनपा कर्मचाऱ्यांकडून योग्य विल्हेवाट लावली.या उपक्रमाबद्दल करांडे यांचे श्रीमंत संभाजीमहाराज (कोल्हापूर) खा.उदयनराजे भोसले, पोलीस अधिकारी कृष्ण प्रकाश,विटा येथील पोलीस अधिकारी कुंभार यांनी कौतुक केले आहे. सायकलवरून भ्रमंती करत ते धार्मिक,ऐतिहासिक ठिकाणांची नियमित स्वच्छता करतात व नागरिकांमध्ये पर्यावरण संरक्षण व संवर्धन तसेच गड किल्ल्यांवर स्वच्छतेतून समृद्धी व पावित्र्य राखण्याचा सातत्यपूर्ण संदेश देतात.



# लेबर कॉलनी येथे श्री खाटू श्याम बाबा मंदिर स्थापना महोत्सव उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर:** विश्वासनगर (लेबर कॉलनी) येथील हनुमान मंदिरात बुधवार 17 जून रोजी श्री खाटू श्याम बाबा मंदिर स्थापना महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.ययात सकाळी 11 वाजेपासून पंकज भागवतगुरुजी व ब्रह्मवृंदांकडून मुर्ती स्थापना,जलाधिवास,प्राणप्रतिष्ठा,अभिषेक, जल,दुग्धाभिषेक व दुपारी महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला .या धार्मिक कार्यक्रमाचा एकहजार भाविकांनी लाभ घेतला. आयोजक किशोर सदावले, पलाश सदावले,सरोज सदावले ,इंदर पहाडीया आदींनी यावेळी परिश्रम घेतले.

## जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला 18 संचालकासाठी 19 जुलैला मतदान

# आजपासून नामनिर्देशन प्रक्रिया सुरू; निवडणूक कार्यक्रम जाहीर

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक परभणी च्या संचालक मंडळाच्या 18 जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था छत्रपती संभाजी नगर येथील अधिकारी सुरेश पी काकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 73 नुसार अ नुसार ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूक निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेल्या कार्यक्रम नुसार 10 जून रोजी निवडणूक अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली त्यानंतर 17 जून ते 24 जून या कालावधीत सकाळी 11 ते 3.00 वाजेपर्यंत उमेदवारांना नाम निर्देशन पत्र दाखल करता येणार असून 24 जून रोजी



नाम निर्देशन पत्राची छाननी होईल तर 25 जून ते नऊ जुलै या कालावधीत उमेदवारी अर्ज मागे घेता येईल या निवडणुकीत 18 संचालक पदासाठी मतदान होणार आहे यामध्ये प्राथमिक कृषी पतपुरवठा वि. का. सेवा संस्था मतदारसंघातून 14 जागा महिला राखीव मतदारसंघासाठी दोन जागा इतर मागासवर्गीय प्रवर्गासाठी एक जागा आणि भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी एक जागा राखीव आहे तसेच अनुसूचित जाती जमाती मतदारसंघ शेतमजूर प्रतिनिधी आणि इतर संस्थांच्या प्रतिनिधीसाठी जागाएक निश्चित करण्यात आले आहेत 19 जुलै रोजी सकाळी आठ ते दुपारी चार या वेळेत मतदान होईल आणि याच दिवशी मतमोजणी निकाल जाहीर केला जाईल या निवडणूक प्रक्रियेत शांततेत आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणा सूचना देण्यात आले आहेत दरम्यान या निवडणुकीकडे जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष लागले असून बँकेच्या संचालक मंडळावर वर्चस्व गाजवणे साठी विविध राजकीय पक्षांनी आपली मोर्चे बांधणी सुरू केली असून त्यामुळे यावर्षीच्या निवडणुकीमध्ये बाजी मारण्यासाठी प्रत्येक जण निकराचे प्रयत्न करत आहेत इच्छुक उमेदवारांना 17 जून पासून कार्यालयीन वेळेत विभागीय सहनिबंधक कार्यालयात नामनिर्देशन अर्ज उपलब्ध करून घ्यावेत असे आवाहन निवडणूक अधिकारी, अ सुरेश पी काकडे यांनी केले आहे

# संजय गांधी मार्केटमध्ये धाड; 2,840 रुपयांचा गुटखा जप्त

**छत्रपती संभाजीनगर :** अन्न व औषध प्रशासन विभागाने सिडको एन-९ परिसरातील संजय गांधी मार्केटमधील साई पान सेंटरवर छापा टाकून प्रतिबंधित गुटख्याचा साठा जप्त केला. ही कारवाई मंगळवारी (१६ जून) दुपारी सुमारे ४.१५ वाजता करण्यात आली.

अन्न सुरक्षा अधिकारी किर्तीका झाडे यांनी याप्रकरणी सिडको पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने सिडको पोलिसांच्या मदतीने साई पान सेंटरची तपासणी केली असता दुकानात २ हजार ८४० रुपयांचा गुटख्याचा साठा आढळून आला. हा साठा तत्काळ जप्त करण्यात आला.

या प्रकरणी दुकानमालक धनंजय श्रीकांत पाठक (वय ३३, रा. गजाननगर, हडको एन-११) याची चौकशी करण्यात आली. मात्र, त्याने गुटखा कुठून आणला किंवा त्याचा पुरवठा कोणी केला याबाबत कोणतीही माहिती दिली नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी धनंजय पाठक याच्याविरुद्ध सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती गायके करीत आहेत.







मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911